सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. १३९/२०२४

विषय : **स्थानिक निवड समितीद्वारे पूर्णवेळ तदर्थ स्वरुपात (Adhoc) शिक्षकी पदे भरताना करावयाच्या आरक्षण पडताळणीबाबत...**

संदर्भ : **शैक्षणिक विभागाचे परिपत्रक क्र. १३८/२०२४, दि. ११ जून, २०२४. (सीसीओ/१९८३)**

उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकास अनुसरून स्थानिक निवड समितीद्वारे तदर्थ (Adhoc) स्वरुपात शिक्षकी पदे भरताना शासनाने वेळावेळी निर्गमित केलेल्या आरक्षण धोरणानुसार आपल्या स्तरावर आरक्षण निश्चिती करुन त्याची पडताळणी विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाकडुन करुन तद्नंतर जाहिरातीची प्रक्रिया राबविण्यात यावी, असे कळविण्यात आले आहे.

याबाबत पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयांमधील सर्व संलग्नित अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, स्थानिक निवड समितीद्वारे **पूर्णवेळ तदर्थ (Adhoc)** स्वरुपातील शिक्षकी पदे भरतेवेळी भरावयाच्या एकुण पदांचे आरक्षण सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्रामध्ये **संस्थेच्या मा. अध्यक्ष/सचिव यांच्या सही शिक्क्यानीशी** तयार करुन आरक्षण कक्षामध्ये पडताळणी करीता संस्थेच्या लेटरहेडवर सदर पदांच्या भरतीच्या आरक्षणाची मागणी नमूद करुन सादर करण्यात यावे.

याबाबत असेही कळविण्यात येते की, संस्थाप्रमुखांनी नामनिर्देशित केलेल्या आरक्षित प्रवर्गातील आरक्षण प्रतिनिधीचा स्थानिक निवड समितीमध्ये समावेश करुन मुलाखतींचे आयोजन करण्यात यावे.

12/6/2024

प्रा. (डॉ.) विजय खरे
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे-४११००७)
जा. क्र. :आरक्षण/ओ-२२/४०२)
दिनांक: १२/०६/२०२४)

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-

१. मा. संचालक/मा.प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था.
   - सदरहू परिपत्रक संबंधितांच्या निदर्शनास आणावे, ही विनंती.
२. कार्यालयीन संचिका (ओ-२२)

Ad-hoc प्रपत्र

शैक्षणिक वर्ष : २०२४-२०२५

स्थानिक निवड समितीद्वारे पूर्णवेळ तदर्थ स्वरुपात भरावयाच्या शिक्षकी पदांचे आरक्षण प्रमाणपत्र

(अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित)

संस्थेचे नाव :

महाविद्यालयाचे नाव :

विद्यापीठ संलग्नित क्रमांक :

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता भरावयाच्या पूर्णवेळ तदर्थ स्वरुपातील (Ad-hoc) शिक्षकी पदांचे सामाजिक आरक्षण

अ. क्र.	पदनाम	विषय	भरावयाची पदे	सामाजिक आरक्षण
१.				
२.				
३.				
४.				
५.				
	एकूण			

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता भरावयाच्या पूर्णवेळ तद्र्थ स्वरुपातील (Ad-hoc) शिक्षकी पदांचे समांतर आरक्षण

अ. क्र.	पदनाम	भरावयाची पदे	दिव्यांग आरक्षण	अनाथ आरक्षण
१.				
२.				
३.				
४.				
५.				
	एकूण			

आमच्या संस्थेची अन्य महाविद्यालये इतर विद्यापीठाशी संलग्नित नाहीत. उपरोक्त नमूद पदांची माहिती खरी असून त्यानुसार स्थानिक निवड समितीद्वारे पूर्णवेळ तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात शिक्षकी पदे भरण्याकरीता उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या आरक्षणाची पडताळणी करुन मिळावी, ही विनंती.

मा. अध्यक्ष
सही व शिक्का

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, न्यायाप्र-२०१४/(प्र.क्र.३२१/१४) विशि-१, दि. २४.०८.२०१५, मा. उच्च न्यायालय, (औरंगाबाद खंडपीठ) येथे दाखल केलेल्या याचिका क्र. १२०५१/२०१५ महाराष्ट्र सर्व बहुजन शिक्षक मंडळ विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर मधील मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयास अधीन राहून, **शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/१६-क, दि. २७ फेब्रुवारी २०२४** नुसार दि. रोजी वरीलप्रमाणे आरक्षणाची पडताळणी करुन देण्यात येत आहे.

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. १३८/२०२४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये विद्यापीठ निवड समितीद्वारे अथवा स्थानिक निवड समितीद्वारे नियुक्त केलेल्या अध्यापकांना मान्यता देण्यासाठी प्रस्ताव प्राप्त होतात. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षासाठी विद्यापीठ निवड समितीद्वारे अथवा स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या अध्यापकांचे निवड समिती अहवाल व शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थां यांनी विद्यार्थी संख्येनुसार कार्यभार तपासून घेवून विहित प्रक्रियेचा अवलंब करून नियमित कायमस्वरूपी (Permanent) अध्यापकीय पदे भरण्याची कार्यवाही करावी.

२. Government of Maharashtra, Law and Judiciary Department, Maharashtra Act No. VIII of 2004 मधील कलम ३(१)(ग) नुसार ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधींच्या नियुक्त्यांसाठी आरक्षण लागू असल्याने अध्यापकांची पदे स्थानिक निवड समितीद्वारे तदर्थ स्वरूपात (Adhoc) भरताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच जाहिरात प्रसिध्द करण्यापूर्वी महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आरक्षण धोरणानुसार त्यांच्या स्तरावर आरक्षण निश्चिती करून त्याची पडताळणी विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाकडून करून घ्यावी आणि तद्नंतर जाहिरातीची प्रक्रिया राबविण्यात यावी.

३. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीता स्थानिक निवड समितीद्वारे तदर्थ (Adhoc) स्वरूपात किंवा तासिका तत्वावर अध्यापकांची नेमणूक करण्यासाठी दि. १५/०६/२०२४ ते दि. ३०/०९/२०२४ या कालावधीत स्थानिक निवड समितीचे आयोजन करण्यात यावे. तसेच ज्या दिवशी स्थानिक निवड समितीचे आयोजन केलेले आहे त्यानंतर ४८ तासांच्या आत निवड समिती अहवाल ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्यात यावा व मूळ निवड समिती अहवाल ७२ तासांच्या आत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा. तसेच शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दहा दिवसाच्या आत शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन पध्दतीने अपलोड करून प्रोफार्मा–बी सोबत शैक्षणिक विभाग मान्यता कक्षाकडे सादर करण्यात यावेत. तसेच सदर प्रस्ताव विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये ज्या अध्यापकांना त्याच महाविद्यालयात/परिसंस्थेत शिक्षक मान्यता देण्यात आलेल्या आहेत, फक्त अशा अध्यापकांचे शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीताचे मुदतवाढीचे (**continuation**) प्रस्ताव संस्थेच्या ठरावासह, नेमणूक आदेश, रूजू अहवाल, शैक्षणिक अर्हता, शोध निबंध प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्रे, पूर्वीची सर्व मान्यता पत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन पध्दतीने दि. १५/०६/२०२४ ते दि. ३१/०८/२०२४ पर्यंत अपलोड करण्यात यावीत. **तसेच अपूर्ण व अस्पष्ट प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची संबंधित महाविद्यालय/संस्थेने नोंद घ्यावी.**

11/6/2024

(स. द. डावखर)
उपकुलसचिव

जावक क्र. सीसीओ/१९८३
दिनांक – ११ जून, २०२४

प्रत :– मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था